

–डॉ. शिवाजी हुसे, *छत्रपती संभाजीनगर*
*साहित्यिक, संपादक व नदी अभ्यासक*

**राजकीय, सामाजिक क्षेत्रात कार्यरत असताना, जिल्हा पातळीवर नेतृत्व करीत असताना त्यांनी आपल्या गावाकडे तसेच शेतीकडे दुर्लक्ष केले नाही. शेतीमध्ये विविध प्रयोग करून सुधारित पद्धतीने ते शेती करीत आहेत. परिसरातील शेतकऱ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष प्रयत्न करीत आहेत. शेती हा त्यांचा आवडता प्रांत. त्यामुळे ते जास्त रमतात ते शेतीमध्ये. त्यांनी केशर आंबे, जांभुळ, तसेच सुधारित तुरिचे वाण असे अनेक पीके घेऊन विक्रम केला आहे. त्यांचा आदर्श घेऊन इतरही शेतकरी शेतीत नवनवे प्रयोग करीत आहेत.**

# भोरडी नदीचा कायापालट करणारे जलमित्र : भाऊसाहेब घुगे

भराडखेडा हे बदनापूर तालुक्यातील एक छोटंसं गाव. या गावाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणारे या गावचे भूमिपुत्र व ग्रामविकासाचे शिल्पकार स्व. एकनाथराव पाटील घुगे. अण्णा या नावाने ते पंचक्रोषी सह जिल्ह्यात सुपरिचित होते. अतिशय प्रतिकुलतेतून त्यांनी यश संपादन केले होते. सामान्य कार्यकर्ता, सरपंच, शासन मान्य गुत्तेदार ते उद्योजक, आदर्श शेतकरी आणि नेते असा त्यांचा प्रवास थक्क

करणारा होता. बदनापूर विधान सभा मतदार संघातून ते थोड्या मताने पराभूत झाले होते. त्यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या विचार व कार्याचा संपन्न व समृद्ध वसा व वारसा त्यांचे सुपूत्र भाऊसाहेब घुगे यांनी समर्थपणे चालवला आहे.

बालवयातच पितृछत्र हरवले. मात्र हा समाज कार्याचा व जनसेवेचा वारसा त्यांनी स्विकारला. आपल्या आई वडिलांची, पुण्याई, ग्रामस्थ व थोरा मोठ्यांचे आशिर्वाद आणि जनतेची खंबीर साथ या जोरावर तसेच उत्कृष्ट संघटन, जनसेवेचा ध्यास, आणि विकासाची आस या सदगुणामुळे भाऊसाहेब घुगे यांनी राजकीय, सामाजिक, कृषी, उद्योग आदी क्षेत्रात स्वतःचा ठसा निर्माण केला. भराडखेडा या गावचे सरपंच पद त्यांच्या कडे चालून आले, पुढे कृषी उत्पन्न बाजार समिती जालना चे संचालक, जालना जिल्हा खादी ग्रामोद्योग मंडळाचे अध्यक्ष, जालना जिल्हा युवा सेना अध्यक्ष असे अनेक महत्वाची पदे त्यांनी भूषविली आहे. त्यांच्या नेतृत्वाचा आलेख अधिकच उंचावत आहे. जालना जिल्ह्यात लोकमान्य युवा नेता म्हणून त्यांची आज ओळख आहे.

राजकीय, सामाजिक क्षेत्रात कार्यरत असतांना, जिल्हा पातळीवर नेतृत्व करीत असतांना त्यांनी आपल्या गावाकडे तसेच शेतीकडे दुर्लक्ष केले नाही. शेतीमध्ये विविध प्रयोग करून सुधारित पद्धतीने ते शेती





करीत आहेत. परिसरातील शेतकऱ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष प्रयत्न करीत आहेत. शेती हा त्यांचा आवडता प्रांत. त्यामुळे ते जास्त रमतात ते शेती मध्ये. त्यांनी केशर आंबे, जांभुळ, तसेच सुधारित तुरिचे वाण असे अनेक पीके घेऊन विक्रम केला आहे. त्यांचा आदर्श घेऊन इतरही शेतकरी शेतीत नवनवे प्रयोग करीत आहेत .

भाऊसाहेब घुगे यांचा स्वभाव हा सर्व समावेशक आहे. साधी राहणी व उच्च विचार सरणी त्यामुळे ते अधिक लोकप्रिय आहे. त्याशिवाय संकट काळात लोकांच्या मदतीला धाऊन जातात. मदतही करतात. कोरोना काळात यांनी गावासह बदनापूर तालुक्यात किराणा सामानाची वाटप करून लोकांना मदत तर केलीच परंतु त्यांना धीरही दिला. कुठेही कार्यक्रम असो, भाऊसाहेब घुगे आवर्जून हजर असतात .

पाणी प्रश्न हा त्यांच्या आस्थेचा व जिव्हाळ्याचा विषय. या मुलभूत प्रश्नावर काम केल्या शिवाय शेतकरी सुखी होणार नाही. हे त्यांनी ओळखले आणि कामाला लागले. त्यांच्या गावा शिवारातून वाहणारी भोरडी ही प्रमुख नदी आहे. परंतु ती कायम कोरडी असायची. नदीचे पात्र अरुंद झाले होते. गाळ साचला होता. भोरडी अन सदा कोरडी अशी एक म्हण त्या भागात आजही प्रचलित आहे. याची भाऊसाहेब यांना खंत वाटायची त्यांनी या नदीचा कायापालट करण्याचा चंग बांधला. त्यासाठी गाव कऱ्यांना विश्वासात घेत विषय नीट समजून सांगितला. भराडखेडा परिसरात काळी कसदार जमीन आहे. विक्रमी उत्पादन घेणारे सतत कष्ट करणारे शेतकरी आहे. त्यांनाही ते पटले. भाऊसाहेब घुगे यांनी




# गाव शिवासाठी नदी पणाला जागते...

## सुखना नदी बचावासाठी, पर्यावरण संवर्धनासाठी कवितांचा जागर

औरंगाबाद : एका जन आंदोलनाची हाक देण्यासाठी, पर्यावरणाच्या जागरासाठी सुखना बोलावते आहे... या निष्ठावंत भूमिकेतून कै. भिकाजीराव हुसे यांच्या स्मरणार्थ कविसंमेलन रंगले. एकापेक्षा एक सरस कविता सादर करून कविंनी पर्यावरण जागराचा संदेश दिला. नदी, पाऊस पाणी, शेती व शेतकरी, पर्यावरण, निसर्ग, मानवतावाद आदी विषयावरील कवितेने रसिकांना अंतर्मुख केले. अशोक गायकवाड यांनी आपल्या कवितेतून नदीची महती विशद केली- गाव, शिवारासाठी नदी पणाला जागते', तर धनंजय गव्हाले यांनी नदिच्या तिराचं हिरवं सपान. 'ही तर लक्ष्मण खेडकर यांनी मी नदीच्या माहेरचा माणूस या कवितेतून नदी संवर्धनाकडे लक्ष वेधले. संमेलनाध्यक्ष डॉ. प्रतिभा अहिरे यांनी आपल्या हातांनीच उध्वस्त करून टाकलाय सारा माळ माणुसकीचा, आता पाऊसही पावसासारखा राहिला नाही आज, उद्या आभाळ ही रंग बदलेल माणसा सारखं..." ही कविता सादर केली. अशा घनगंभीर कवितांनी रसिक मनाला भिजवणारं कविसंमेलन रविवारी (दि. १०) गांधी भवनात संपन्न झालं. सुखना नदी बचाव जन आंदोलन संघर्ष समिती, तिफण त्रैमासिकच्या वतीने या कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

या अनोख्या कविसंमेलनाचे उद्घाटन सकाळचे संपादक दयानंद माने यांच्या हस्ते रोपाला पाणी देऊन झाले. उदघाटनपर भाषणात माने म्हणाले की, नदी हा माणसांना बांधून ठेवणारा धागा आहे. पाणी, आणि पर्यावरण हा जिवनातील महत्वाचा घटक आहे. नदीचे पाणी शरीर आणि मनाचे शुध्दीकरण करते. मात्र अविवेकामुळे नदी, पर्यावरण दुषित करण्याचे काम सुरू आहे. मनपा प्रशासकीय पातळीवर पुरस्कारासाठी, दिखाऊ भुमिकेतून काम सुरू आहे. केवळ शहरातून जाणाऱ्या नदीपात्राचे शुध्दीकरण करून फायद्याचे नाही, संपूर्ण नदीचे शुध्दीकरण झाले पाहिजे. तरच या चळवळीला अर्थ येईल. कविसंमेलनाचे प्रास्ताविक डॉ. शिवाजी हुसे यांनी केले. ते म्हणाले, जिवनदायिनी नद्या संपुष्टात आल्या तर मानवी जिवनही संपुष्टात येईल. कवि, लेखक संवेदनशील माणूस असल्याने त्यांच्या शब्दाला मोल असते, कवींनी सामाजिक प्रश्नाविषयी एल्गार पुकारावा, म्हणून हे कविसंमेलन आयोजित करण्यात आले आहे असे ते

म्हणाले. कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी कवियत्री प्रतिभा अहिरे होत्या. त्यांनी दुषित होत जाणार्या सामाजिक आणि नैसर्गिक पर्यावरणावर कविता सादर केली.

*कोणतीही वाट हिरवीशी नसते आताशा,*
*रानं तरी कुठं हिरवीशी असतात?*
*आपल्या हातांनीच उद्धवस्त करून टाकलाय*
*सारा माळ माणुसकीचा*
*पाऊसही पावसासारखा राहिला नाही आज*
*उद्या आभाळही रंग बदलेल माणासासारखं*

या कवितेनं रसिकांना अंतर्मुख केलं. यानंतर प्रा. ललित अधाने यांनी कष्टकरी, शेतकर्यांची वेदना पुढील शब्दात व्यक्त केली...

*पंक्चरलेल्या आयुष्याची गणितं मांडतांना,*
*बघ माझा आत्मा हवेत दरवळतो आहे*
*मातीत मिसळले आहे घामाचे हे रक्त चंदन*

धनंजय गव्हाले यांनी रानं, शिवाराच्या लयीत कविता सादर केली...

*कोवळ्या उन्हात झालर पिवळी*
*झिंगल्या रानात कोण गे मुरळी*
*नदीच्या तिराचं, हिरवं सपान*
*हिरव्या झाडांची हिरवी कमान*

लक्ष्मण खेडकर यांनी माणसाच्या अमर्याद हव्यासावर हल्ला चढवला...

*मी फक्त एवढेच म्हणालो*
*तुम्ही खूप छळता रे नदीला*
*स्वतःला भूमिपुत्र म्हणणारे चवताळून*
*आले माझ्या अंगावर*
*ए गपये, नदी आमची, गाव आमचं*
*आमचं आम्ही पाहून घेऊ*
*तू तर बाहेरचा, त्यांना कुठे माहीत होतं*
*मी तर माणूस नदीच्या माहेरचा*

सुनील उबाळे यांनी आपला दाहक अनुभव मांडला...

*आपल्या जगण्यातलं इमान पणाला लावून*
*जपत राहिलो अक्षरलेण्यांचे महाकाय जंगल,*
*विषारी झाडांच्या मुळाशी ओल*
*धरून ठेवली करूणेची*
*आणि सावली नाकारणाऱ्या माणसांचा*
*चेहरा होत गेलो कित्येकदा*

धम्मपाल जाधव यांनी गरीब, वंचितांचा पाऊस अनुभव मांडला...

*त्या घरांना पाऊस आवडत नाही*
*पापुद्रे सोडतात भिंती*
*गळून पडते त्याच्यातील माती*
*बाहेरची रिमझिम आपल्यासाठी नसतेच*
*ते म्हणतात हा पाऊस*
*न आवडणारा माणूस आहे*

रामप्रसाद वाव्हळ यांनी पावसाचे वेगळे रुप सादर केले...

*हे आभाळ भरून आलंय पुन्हा*
*पुन्हा भिजण्याचा घडूच नाही गुन्हा*
*हा पाऊस आगीचा पुरस्कर्ता*
*थेंबा थेंबानं उडून देतो भडका*

या कविसंमेलनात नारायण खेडकर, सुनील डोके, हबीब भंडारे, श्रीराम दाबके, रामचंद्र झाडे, संदिप ढाकणे, एम. एम. खुटे, प्रविण दाभाडे, ज्ञानेश्वर गायके, अशोक गायकवाड, लक्ष्मण वाल्डे, अजिंक्य ढाकणे, प्रा. एकनाथ डोळे, यांच्या कवितांनी रसिकांच्या मनाचा तळ ढवळून काढला. बाहेर पाऊस पडत असताना कवितांच्या पावसाने मनांना भिजवले. यावेळी प्रिया धारूरकर, माधुरी चौधरी, डॉ. रमेश देवढे, एकनाथ डोळे, डॉ. सुखदेव इघारे आदींची उपस्थिती होती.

सुत्रसंचालन संदिप ढाकणे यांनी केले. प्रविण दाभाडे यांनी आभार मानले. या कार्यक्रमास कवी. कवयित्री मोठ्या संख्येने उपस्थित होते.

•••



# नदी वाचविण्यासाठी कवींचा पुढाकार

## सुखना , दुधना , लहुकी त्रिवेणीसंगमावर रंगले कविसंमेलन...

**डॉ. प्रवीण बनसोड :** 'माय'या दोन अक्षरी शब्दात किती सामर्थ्य आहे. नदीला जीवनदायींनी असं म्हटलं जातं पण त्याहीपेक्षा 'माय'हे संबोधन अधिक शोभून दिसतं. म्हणूनच वऱ्हाडातील 'पूर्णा'असो की मराठवाड्यातील 'सुखना'.. दोघींनाही 'पूर्णामाय'आणि 'सुखना माय'अशी हाक दिली जाते.नदी म्हटलं की आपल्यासमोर उभी राहते खळाळून वाहणारी, आजूबाजूच्या शेतशिवाराचं पोषण करणारी माय..

नदीकाठी तासनतास बसून अवघं नदीचं पात्र व पाण्याचा निर्मळ प्रवाह अनुभवण्याची मजा काही औरच असते . नदीचे दोन्ही काठ पावसाळ्यात नदी दुथडी भरली की एकमेकास भेटतात . काठोकाठ भरलेले नदीचे पात्र आपल्याशी बोलतात ... संवाद साधतात . नदीत पोहणे हा आनंद आणखी वेगळा . पोहता येत नाही असा नदीकाठचा माणूस अपवादात्मक सापडेल . एकेकाळी बारमाही वाहणाऱ्या सर्वच जीवनदायीनी नद्या आज मात्र मरणासन्न अवस्थेत आहेत. नदयाचे नाले झाले आहे . काळाच्या ओघात आपण या मोठ्या गोष्टीकडे का दुर्लक्ष केले? खरे तर जेव्हापासून नद्या आटल्या तेव्हापासून शेती नासली. नद्या आटल्या की आटवल्या हासुद्धा एक स्वतंत्र लेखाचा विषय आहे. शेतीला वाचवायचे असेल तर नद्यांचे पुनरुर्जीवन करणे गरजेचे आहे, हे मात्र खरे आहे. पूर्वी नदी इतकी स्वच्छ, सुंदर आणि निर्मळ होती की आम्ही ओंजळीनी पाणी प्यायचो ..

आज नदीचं पाणी हातात घ्यावंस वाटत नाही. आपली शेती भकास झाली त्याचं कारण आपण आपल्या नद्या आटवल्या हेच आहे.

पूर्णा असो की सुखना.

नदी आपली लोकमाता आहे...

इतिहास साक्षी आहे मानवी जीवन नदीच्या

काठाकाठाने फुलले. शेत शिवार नदीच्या काठाकाठाने बहरले.तेथून पुढे मानवी संस्कृती विकसित झाली. हे सर्व सांगण्याचं कारण म्हणजे सुखना नदीच्या कोरड्या पात्रात पडलेला कवितांचा पाऊस..

औरंगाबाद महानगराजवळ पळशी हे गाव आहे. शहर पळशी म्हणूनही ते ओळखले जाते. अगदी शहरालगत हे गाव आहे. सुखना नदीच्या उगम स्थानापासून अगदी जवळच. याच गावातील सुखना नदी पात्रात ऐतिहासिक नहर आहे. मलिक अंबर यांनी या नहरीचा उपयोग औरंगाबाद शहरासाठी करून घेतल्याचे गावकरी सांगतात. मात्र आज ही नहर पडिक अवस्थेत आहे. नहरीजवळून समृद्धी महामार्ग जातो. या महामार्गा खालून सुखना नदीचे पात्र आहे. एकेकाळी सुरू असलेला प्रवाह आज खंडित झाला आहे. येथे सुखनाचा श्वास गुदमरला. नदीचा नैसर्गिक प्रवाह कोंडला. त्यामुळे सुखना नदीचा श्वास मोकळा करावा,अशी मागणी सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समिती करीत आहे. सुखनाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील सर्वच नद्यांची विदारक स्थिती प्रातिनिधीक स्वरूपात अभिव्यक्त झाली आहे. या निमित्ताने नदी,शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या एका नव्या चळवळीचा जन्म झाला. नदीला पुनर्जन्म द्यावा हा ध्यास मनात जागून नदीच्या कोरड्या पात्रात कवी संमेलन रंगले.

"सुखना मायची कहाणी" हा शिवाजी हुसे यांचा काव्यसंग्रह. नावातच एका समृद्ध नदीचा प्रवास आणि अस्वस्थता. त्यांच्या पुढाकाराने दुधना- सुखना - लहुकीच्या त्रिवेणी संगमावर काव्यमैफिल रंगली.

"नदीचे मूळ अन ऋषींच मूळ
शोधू नये म्हणतात तरीही मी
कुतुहलापायी तुझं मूळ शोधू लागलो"

अशा ह्या कवितेतून सुरू होतो एका नदीचा प्रवास..

पूर्वी बहुतेक गावगाडा नदीवर विसंबून असायचा, तिच्या पाण्यावर शेती फुलायची, दोन वेळेचे जेवण मिळायचे... शेती आणि नदी ह्यांचे जे एक अतूट नाते अजूनही तेवढेच एकरूप आहे...

पण कालांतराने सारे बदलत गेले, प्रदूषणामुळे नदीचे रूपांतर हळूहळू एका छोट्या नाल्यात होऊ लागले, शहरीकरणाच्या नादात गाव हरवला व गावगाडा संपत गेला, नदीचे अस्तित्व हरवले आणि शेती कायमची ओसाड झाली.ही खंत कवींच्या भावनाशील मनाला बघवत नाही, ज्या नदीने वेळोवेळी साऱ्यांची दुःख पदरात घेतली पण त्या नदीची काळजी आपल्याला घेता आली नाही, ही खंत त्याच नदीच्या कोरड्या पात्रात एकत्र जमून सर्वांनी व्यक्त केली. कोरड्या नदीपात्रात एकत्र जमून सर्वांनी 'नदी वाचवा -शेती वाचवा'अशी आर्त हाक दिली. पण नदी वाचवण्यासाठी फक्त घोषणा कामाच्या नाहीत, त्यासाठी जबरदस्त इच्छाशक्ती लागते, आणि दुर्दैवाने आज ती नाही, ही वस्तुस्थिती आहे. काळाच्या ओघात अनेक स्थित्यंतरे झाली, नदीचे स्वरूप बदलत गेले, तिचे अस्तित्व चिमूटभर राहिले. माणूस नामानिराळा होऊन तटस्थ झाला, तो फक्त स्वतःच्या सुखाच्या कल्पनेपायी सार काही मिटवत चालला आहे, प्रगतीच्या नादात तो काय गमावत आहे. ह्याची त्याला शुद्ध राहिली नाही, आणि संवेदनशील कवींना ह्याची खंत वाटते, युगेनयुगे जिच्या काठावर संस्कृती फुलत गेली, जिच्यामुळे एक ओळख मिळाली, ती ओळखच आता नामशेष व्हायच्या मार्गावर आहे.

"माणूसपण नाकारणाऱ्या
साऱ्याच कोलाहलात
तुझाही जीव गुदमरतोय.."
तुझ्या भरवशावरच
हलवू शकलो
हा दुःख आणि वेदनांचा
अवजड डोंगर..."

अश्या भावसंवेदनशील कवीला आता मात्र नदीची